# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
(पुर्वीचे सोलापूर विद्यापीठ ) ( Formerly Solapur University)

सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)

Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)

☎: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३०० संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac, www.sus.ac.in

ईमेल - dbee@sus.ac.in ● परीक्षा व मूल्यमापन विभाग ● विस्तारीत क्रमांक - १३०


जावक क्र. : पुअहोसोविसो/२०२४/ 2443 दि. 17 DEC 2024

परिपत्रक क्र. 68

सर्व प्राचार्य / संचालक, संलग्नित महाविद्यालय / संस्था यांना प्राप्त आदेशान्वये कळविण्यात येते की, दिनांक १० डिसेंबर २०२४ पासून प्रस्तुत विद्यापीठाच्या पारंपारिक परीक्षा सुरु झालेल्या आहेत. त्याअनुषंगाने खालील महत्वपूर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

१. विविध अभ्यासक्रमांचे विद्यार्थ्यांचे परीक्षा फॉर्म महाविद्यालयामार्फत भरण्यात आलेले आहेत. यानुसार ज्या विद्यार्थ्यांचे हॉल तिकीट परीक्षा फॉर्म सबमिट करुनही जनरेट झालेले नाहीत असे विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये म्हणून ताबडतोब महाविद्यालयामार्फत परीक्षा विभागास संपर्क साधावा जेणेकरुन संबंधित विद्यार्थ्यांचे हॉलतिकीट जनरेट करता येईल व त्याचे होणारे शैक्षणिक नुकसान टाळता येईल.

२. विविध परीक्षा केंद्रांना मा. कुलगुरु, मा. प्र. कुलगुरु तसेच संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ सरप्राईज भेट देत आहेत. भेटीदरम्यान काही महाविद्यालयांचे स्ट्रॉंग रुममधील सीसीटीव्ही कार्यान्वित नसल्याचे निदर्शनास येत आहे. सदर बाब अत्यंत गंभीर असून याअनुषंगाने काही समस्या उदभवल्यास महाविद्यालय जबाबदार राहील. त्याचबरोबर परीक्षा केंद्रावर परीक्षा कालावधीमध्ये अंतर्गत व बहिस्थ परीक्षक यांची उपस्थिती अनिवार्यच आहे. अंतर्गत व बहिस्थ परीक्षक परीक्षा केंद्रावर वेळेवर हजर नसल्यास किंवा उशिरा आल्यास किंवा परीक्षा पूर्ण होईपर्यंत न थांबल्यास सदर बाब तात्काळ विद्यापीठास कळविण्याची जबाबदारी संबंधित मा. प्राचार्य महोदय यांची राहील. याअनुषंगाने काही समस्या असल्यास तात्काळ मा. प्राचार्यामार्फत परीक्षा विभागास कळविण्यात यावे.

३. स्ट्रॉंग रुममध्ये प्रश्नपत्रिका डाऊनलोड करणे व प्रिंटींग करणे ही कामे कॅमेराच्या नियंत्रणाखाली रेकॉर्डीगसह करणे बंधनकारक आहे.

४. स्ट्रॉंग रुम व्यतिरीक्त अंन्य दुस-या हॉलमध्ये उत्तरपत्रिका स्विकारण्याचे कामकाज करण्यात यावे.

५. यापूर्वीच आपणास परिपत्रकान्वये कळविल्याप्रमाणे विविध अभ्यासक्रमाच्या ज्या दिवशी परीक्षा होतील त्याचदिवशी लिहिलेल्या उत्तरपत्रिका व्यवस्थित सील करण्यात याव्यात व कॅपला जमा करण्यात याव्यात.

ऑक्टोंबर / नोव्हेंबर २०२४ परीक्षेच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे विद्यापीठास सहकार्य करावे.

17/12/24

डॉ. श्रीकांत ग. अंधारे
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत -१) मा. कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
२) मा. प्र. कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ